19 SEP 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभिनेता आर. माधवनने जिंकली तरुणाईची मनं

## भविष्याचे नियोजन करून आयुष्यात यशस्वी व्हा : आर. माधवन : 'कम्पॅशन २४' स्वयंसेवी संस्थेकडून २ हजार मुली शैक्षणिक दत्तक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापुरात शिकत असताना आयुष्यभराची प्रेरणा मिळाली. विद्यार्थ्यांनी कष्ट आणि प्रयत्न या गोष्टींची कास धरावी. प्रत्येक मोठ्या गोष्टीची सुरुवात ही सूक्ष्म पद्धतीने होते, हे लक्षात घ्या. भविष्याचे काटेकोर नियोजन करून आयुष्यात यशस्वी व्हा, असा मूलमंत्र नामवंत अभिनेता आर. माधवन याने सोमवारी तरुणाईला दिला. अभिनेता माधवनला पाहण्यासाठी आणि त्याचे प्रेरणादायी भाषण ऐकण्यासाठी तरुणाईने प्रचंड गर्दी केली होती.

'कम्पॅशन २४' या स्वयंसेवी संस्थेकडून २'हजार मुलींना शैक्षणिक दत्तक घेण्याचा कार्यक्रम आज झाला. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी आर. माधवन प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होता. विद्यार्थ्यांनी त्याच्या भाषणाला क्षणाक्षणाला टाळ्यांची दाद देत जल्लोष केला. या कार्यक्रमास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते.




**कोल्हापूर : 'कम्पॅशन २४' या स्वयंसेवी संस्थेकडून २ हजार मुलींना शैक्षणिक दत्तक कार्यक्रमाचे उद्घाटन रोपट्यास पाणी घालून करताना अभिनेता आर. माधवन. डावीकडून मिलिंद धोंड, खासदार धनंजय महाडिक, कुलगुरू देवानंद शिंदे, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, कुलसचिव विलास नांदवडेकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात आर. माधवनला पाहण्यासाठी दुपारी दोनपासूनच तरुणाईने गर्दी केली होती. रिमझिम पावसाची तमा न बाळगता विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मोठी गर्दी केली. माधवन याचे आगमन होताच विद्यार्थ्यांनी टाळ्या आणि शिट्ट्या वाजवून त्याचे जोरदार स्वागत केले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी व्यासपीठावर जाऊन त्याच्यासोबत फोटो काढले.

नमस्कार कोल्हापूरकर, अशी मराठीत सुरुवात माधवनने करताच विद्यार्थ्यांनी शिट्ट्या वाजवून दाद दिली. यानंतर काहीवेळ मराठीत आणि त्यानंतर इंग्रजीमध्ये त्याने विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कोल्हापूर हे माझे प्रेरणास्थान असल्याचे सांगत राजाराम कॉलेजला असतानाच्या आठवणी त्याने यावेळी विद्यार्थ्यांशी शेअर केल्या. कोल्हापूरला यायला नेहमीच आवडते, असे सांगत ही माझी सासुरवाडी असल्याचे सांगायलाही तो विसरला नाही. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी नम्रता आणि आत्मविश्वास आवश्यक आहे. या गोष्टी कोल्हापुरात शिकल्याचे त्याने प्रांजळपणे सांगितले. विद्यार्थिदशेत वादविवादापासून कटाक्षाने दूर राहा आणि नियम काटेकोर पाळा, असे सांगताना त्याने सर्वांशी माणूस म्हणून प्रेमाने वागण्याचा सल्ला दिला.

यावेळी खासदार महाडिक म्हणाले, सर्वांनी सामाजिक जबाबदारी उचलली पाहिजे. विद्यार्थ्यांचे आयडॉल हे छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विवेकानंद, वीर सावरकर असले पाहिजेत. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आदर्श व्यक्तींची प्रेरणा घ्या. आपल्या आसपास अनेक व्यक्ती उत्तुंग कामगिरी करत असतात. त्यांच्याकडून शिकत राहा. विशेष पोलिस महानिरीक्षक नांगरे-पाटील म्हणाले, तरुणांनी भविष्याची ब्लूप्रिंट आताच तयार करावी. कोणत्याही क्षेत्रात जा; पण त्यामध्ये टॉप होण्याचे स्वप्न बघा. यावेळी आर. माधवन हा माझा शैक्षणिक वयातला गुरू असल्याचे सांगत कॉलेजमधील धमाल आठवणी सांगितल्या.

'कम्पॅशन २४' स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष मिलिंद धोंड यांनी प्रास्ताविकात सांगितले, आम्ही सहा वर्षांपासून सर्वसामान्य मुलींच्या शिक्षणासाठी मदत करत आहोत. आज आम्ही विविध शाळांतील दोन हजार विद्यार्थिनींना शिक्षणासाठी दत्तक घेतले आहे. यापुढेही संस्थेच्या वतीने भरीव काम सुरू राहील. यावेळी विविध क्षेत्रात यश मिळवलेल्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास कौस्तुभ मराठे, प्रवीण घाटगे आदींसह मोठ्या संख्येने विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे ९४.३ टोमॅटो एफ.एम. रेडिओ पार्टनर होते.

19 SEP 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## आर. माधवन : 'एनजीओ कम्पॅशन-२४' कडून दोन हजार विद्यार्थिनींच्या शिक्षणाला बळ

# बदल स्वीकारुन यशाकडे वाटचाल करा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** छोट्या-छोट्या चांगल्या बदलांतून व्यक्तिमत्त्व घडत असते. विविध स्वरुपांतील असे चांगले बदल स्वीकारून यशाकडे वाटचाल करा, असे आवाहन चित्रपट अभिनेता आर. माधवन यांनी सोमवारी येथे तरुणाईला केले. येथील 'एनजीओ कम्पॅशन-२४' संस्थेतर्फे आयोजित 'इन्स्प्रिरेशन'अंतर्गत दोन हजार विद्यार्थिनींना शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेण्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रातील या कार्यक्रमास कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रवीण घाटगे, कौस्तुभ मराठे प्रमुख उपस्थित होते. चित्रपट अभिनेता आर. माधवन आणि विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी भरपावसात तरुणाईने गर्दी केली होती. विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला.





समीर अत्तार

कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात सोमवारी चित्रपट अभिनेता आर. माधवन यांच्या प्रमुख उपस्थितीत 'एनजीओ कम्पॅशन-२४' संस्थेतर्फे दोन हजार विद्यार्थिनींना शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेण्याचा कार्यक्रम झाला. यावेळी डावीकडून 'एनजीओ कम्पॅशन-२४' चे अध्यक्ष मिलिंद धोंड, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, प्रवीण घाटगे, कौस्तुभ मराठे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते. यावेळी आर. माधवन यांना 'एनजीओ कम्पॅशन-२४' तर्फे रेखाचित्र भेट देण्यात आले.

चित्रपट अभिनेता आर. माधवन म्हणाले, आपल्या शिक्षण, ज्ञानाचा उपयोग समाजासाठी व्हावा. दुसऱ्यांवर विसंबून राहू नका. दोन हजार विद्यार्थिनींना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाला बळ देण्याचा उपक्रम प्रेरणादायी ठरणारा आहे.

विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील म्हणाले, महाविद्यालयीन जीवनातच आपल्या आयुष्याची ब्ल्यू प्रिंट ठरवा. त्यात आत्मविश्वास, आत्मभानाचा समावेश करावा. कोणतेही क्षेत्र निवडा. मात्र, त्यात अव्वल स्थानी जाण्याचे ध्येय ठरवा. स्वत:वर विश्वास ठेवा.

खासदार धनंजय महाडिक म्हणाले, तरुणाईने आपल्या ज्ञानाचा वापर समाजासाठी करावा. दोन हजार विद्यार्थिनींना शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेण्याचा मिलिंद धोंड यांच्या 'एनजीओ कम्पॅशन-२४'चा उपक्रम आदर्शवत ठरणारा आहे. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, समाजातील वंचित-दुर्बल घटकांना बळ देण्यासाठी प्रत्येकाने आपआपल्यापरीने योगदान द्यावे. चांगल्या व्यक्तिमत्त्वांचा आदर्श घेऊन आयुष्यात मोठे व्हावे.

कार्यक्रमाचा प्रारंभ प्रमुख उपस्थितांच्या हस्ते तुळशीच्या रोपाला पाणी घालून झाला. त्यानंतर विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी डी. आर. मोरे, सुजित चव्हाण, आकाश कोरगांवकर, आदी उपस्थित होते. 'एनजीओ कम्पॅशन-२४' चे अध्यक्ष मिलिंद धोंड यांनी उपक्रमांची माहिती दिली.

## कसे, काय, कोल्हापूर ?

कसे, काय, कोल्हापूर? अशी मराठीत विचारणा करीत आर. माधवन यांनी बोलण्यास सुरुवात केली. बऱ्याच कालावधीनंतर कोल्हापुरातील ओळखीचे चेहरे पाहून खूप बरे वाटले. एका महाविद्यालयात अभियांत्रिकीच्या शिक्षणासाठी दाखल करण्याकरिता मला वडिलांनी नेले. मात्र, तेथील वातावरण पाहून तेथून त्यांनी थेट येथे आणले. या दिवशी राजाराम कॉलेजकडे सकाळी रिक्षातून जात होतो. रिक्षात बसताच अंबाबाईचे सुप्रभात गीत लागले आणि हाच शुभशकून मानून माझे शिक्षण येथे करण्यावर त्यांनी शिक्कामोर्तब केला. शिवाजी विद्यापीठातील अभ्यासिकेत पहिल्यांदा ज्या मुली शेजारी बसलो, तीच आज माझी पत्नी आहे. तिला कागलमध्ये मी प्रपोज केले, अशा विविध आठवणी त्यांनी सांगितल्या.

## पावसातही तरुणाईचा उत्साह

दुपारी साडेचार वाजताच लोककला केंद्र सभागृह तरुणाईच्या गर्दीने खचाखच भरले. कार्यक्रम सुरु होताच पाऊस सुरु झाला. भरपावसात छत्रीचा आधार घेत अनेक युवक-युवतींनी, तर काहीजण भिजत कार्यक्रमासाठी थांबून होते. चित्रपट अभिनेता आर. माधवन आणि विशेष पोलीस महानिरीक्षक नांगरे-पाटील,यांचे कार्यक्रमस्थळी आगमन होताच तरुणाईने एकच जल्लोष केला. त्यांच्या मार्गदर्शनावेळी उपस्थित तरुणाईने टाळ्या, शिट्ट्यांच्या गजरात दाद देत राहिली.

1 9 SEP 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अमित गद्रे



शिवाजी विद्यापीठामध्ये सोमवारी प्रसिद्ध अभिनेते आर. माधवन यांना चाहत्यांचा गराडा पडला होता.

# ‘तरुणांनो, समाजसेवेचा वारसा जपा’

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

‘कोल्हापूरमध्ये असताना केलेल्या कष्टाच्या जोरावरच यश मिळवले. येथे प्रचंड उर्जा आहे. या उर्जेचा वापर करून तरूणाईने कष्टांच्या जोरावर यश साध्य करावे’, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते आर. माधवन यांनी केले. शिवाजी विद्यापीठामध्ये एनजीओ ‘कम्पॅशन २४’द्वारे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. अभिनेते आर. माधवन कार्यक्रमाला उपस्थित असल्याने तरुणाईची प्रचंड गर्दी होती. यावेळी संस्थेच्यावतीने दोन हजार मुलींना शिक्षणासाठी दत्तक घेतले.

आर. माधवन म्हणाले, ‘कॉलेज शिकत असताना कोल्हापूरमध्ये मी मोठ्या प्रमाणात कष्ट केले. त्यामुळेच भविष्यात मला यश मिळाले कोल्हापूरसारखी उर्जा इतर कोणत्याही शहरात नाही. त्यामुळे येथील लोकांनी जगभर नाव केले आहे. येथ समाजसेवेचा, मदतीचा वारसा आहे. हाच वारसा जपत ही संस्था काम करीत आहे. दोन हजार मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलणे ही कौतुकास्पद बाब आहे. शिक्षणाचा उपयोग समाजासाठी केला पाहीजे. छोट्या छोट्या बदलातूनच प्रत्येक व्यक्तीचे चांगले व्यक्तीमत्व घडत जाते. त्यातूनच यशाकडे वाटचाल होते. राजाराम कॉलेजमध्ये शिकत असताना अनेक गोष्टी शिकता आल्या. त्या काळात भेटलेल्या लोकांना मी आयुष्यभर विसरू शकलो नाही.’




**शिवाजी विद्यापीठामध्ये सोमवारी एनजीओ ‘कम्पॅशन २४’द्वारे आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रसिद्ध अभिनेते आर. माधवन. व्यासपीठावर डावीकडून मिलिंद धोंड, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे पाटील, प्रविण घाटगे, कौस्तुभ मराठे, कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर.**

विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे पाटील म्हणाले, ‘कॉलेज शिक्षण घेत असताना माझा सोबती आर. माधवन हा माझा आदर्श होता. त्याच्यामध्ये जिद्द, आत्मविश्वास आणि कष्ट करण्याची तयारी होती. तुम्ही विद्यार्थ्यांनी पुढील आयुष्याची ब्ल्यू प्रिंट आताच बनवावी. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो याची कायम जाणीव ठेवा.’

खासदार धनंजय महाडिक म्हणाले, ‘दोन हजार मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलण्याचा उपक्रम खूप चांगला आहे. मिलींद धोंड हे विविध समाज उपयोगी उपक्रम राबवत आहेत.’

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे भाषण झाले. यावेळी तुळशीच्या रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. ‘वुई केअर’ कोल्हापूर संस्थेअंतर्गत काम करणाऱ्या निर्भया पथकाचा सत्कार करण्यात आला. विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर, कौस्तुभ मराठे, डॉ. डी. आर. मोरे, प्रवीण घाटगे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सुशील रॉयगांधी यांनी आभार मानले.

## ‘कसं काय कोल्हापूर?

‘कसं काय कोल्हापूर? विद्यापीठात ओळखीचे चेहरे पाहून बरे वाटले’, असे म्हणत आर. माधवन यांनी भाषणाला सुरवात केली. त्यावेळी उपस्थित तरुणाईने जल्लोष केला. यात कोल्हापूर आणि राजाराम महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला.

19 SEP 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कष्टाच्या जोरावर यश साध्य करा

## - आर. माधवन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

कोल्हापूरमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. या ऊर्जेचा वापर करून येथील तरुणाईने आपल्या कष्टाच्या जोरावर यश साध्य करावे, असा सल्ला प्रसिद्ध अभिनेते आर. माधवन यांनी दिला. ते शिवाजी विद्यापीठामध्ये 'कम्पॅशन २४'द्वारे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी तरुणाईने मोठी गर्दी केली होती.

आर. माधवन म्हणाले, कोल्हापूरमध्ये असताना मी मोठ्या प्रमाणात कष्ट केले. त्याच्याच जोरावर यश साध्य झाले आहे. कोल्हापूरसारखी ऊर्जा इतर कोणत्याही शहरात नाही. त्यामुळे येथील लोकांनी जगभर आपले नाव केले आहे. येथे समाजसेवेचा वारसा आहे. हाच वारसा जपत मिलिंद धोंड काम करत आहेत. त्यांच्या संस्थेने दोन हजार मुलींचा शिक्षणाचा खर्च उचलला आहे, ही बाब कौतुकास्पद आहे.

आपल्या शिक्षणाचा उपयोग सामजासाठी केला पाहिजे. छोट्या-छोट्या चांगल्या बदलातून आपले व्यक्तिमत्त्व घडत जाते. त्यामुळे आपली यशाकडे वाटचाल होऊ लागते. राजाराम महाविद्यालयात शिकत असताना अनेक गोष्टी शिकता आल्या. राजाराम महाविद्यालयात अनेक मित्रही भेटले. त्या काळात भेटलेल्या लोकांना मी आयुष्यभर विसरू शकलो नाही.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'कम्पॅशन २४'द्वारे आयोजित कार्यक्रमात बोलताना सिने अभिनेता आर. माधवन. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खा. धनंजय महाडिक, विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील व इतर.** (छाया : एस. अली)

विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील म्हणाले, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना महाविद्यालयातीलच माझा सोबती आर. माधवन हा माझा आदर्श होता. त्याच्यामध्ये जिद्द, आत्मविश्वास आणि कष्ट करण्याची तयारी होती. या काळातच आपल्या आयुष्याची ब्ल्यू प्रिंट तयार करा. आपला आत्मविश्वास आपण जपला पाहिजे. रोज आपल्या ध्येयाकडे वाटचाल करत राहिले पाहिजे.

खा. धनंजय महाडिक म्हणाले, दोन हजार मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचलण्याचा उपक्रम खूप चांगला आहे. मिलिंद धोंड विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या कार्यातून तरुणांना प्रेरणा मिळेल. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वामी विवेकानंद हे आपले आदर्श असले पाहिजेत.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, समाजातील वंचित घटकांसाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे. मुलींच्या शिक्षणासाठी घेण्यात आलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे. कार्यक्रमासाठी तरुण-तरुणींची मोठी गर्दी होती. विद्यापीठातील लोककला केंद्र पूर्ण भरून गेले होते.

तुळशीच्या रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. 'वुई केअर' कोल्हापूर संस्थेंतर्गत काम करणाऱ्या निर्भया पथकाचा सत्कार करण्यात आला, तर ज्या मुलींना कम्पॅशन २४ कडून मदत करण्यात येत आहे, त्यापैकी काही मुलींनी मनोगत सादर केले. महिला छेडछाडीच्या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेणारे पथनाट्य सादर करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर, कौस्तुभ मराठे, डॉ. डी. आर. मोरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

### भाषणाची सुरुवात मराठीतून

कसं काय कोल्हापूर... असे म्हणत आर. माधवन यांनी भाषणाला सुरुवात केली. यावेळी तरुण-तरुणींनी जल्लोष करण्यास सुरुवात केली. ते सुरुवातीची काही वाक्ये मराठीत बोलले. यामध्ये कोल्हापूर आणि राजाराम महाविद्यालयातील आठवणींना उजाळा दिला. या काळातले आपले दिवस हे आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम दिवस असल्याचे त्यांनी सांगितले.

19 SEP 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : कम्पॅशन २४ स्वयंसेवी संस्थेच्यावतीने दत्तक घेतलेल्या विद्यार्थिनींसमवेत डावीकडून मिलिंद धोंड, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खासदार धनंजय महाडिक, अभिनेता आर. माधवन, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, प्रवीण घाटगे, कौस्तुभ मराठे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

19 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरची ऊर्जा इतरांनाही द्या..

## आर. माधवन : 'कम्पॅशन २४' स्वयंसेवी संस्थेकडून दोन हजार विद्यार्थिनी दत्तक




कोल्हापूर : 'कम्पॅशन २४' या स्वयंसेवी संस्थेच्या कार्यक्रमात सोमवारी बोलताना अभिनेता आर. माधवन.

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : "तरुणांनो, प्रत्येक बदलाची सुरवात ही छोट्या बदलाने होते. दुसऱ्यांवर विसंबून न राहता स्वत:त बदल घडवा. जो बदल तुमच्यात घडेल, त्याचा परिणाम या शहरावर होईल. कोल्हापूर हे ऊर्जामय शहर आहे. या शहरातील ऊर्जा दुसऱ्यांना देण्यासाठी पुढाकार घ्या," असा कानमंत्र प्रसिद्ध अभिनेते आर. माधवन यांनी आज येथे दिला.

'कम्पॅशन २४' या स्वयंसेवी संस्थेतर्फे दोन हजार विद्यार्थिनींना दत्तक घेण्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील व खासदार धनंजय महाडिक प्रमुख उपस्थित होते. लोककला केंद्रात कार्यक्रम झाला.

> तुमच्या आयुष्यातील 'ब्लू प्रिंट' कमवायची वेळ हीच आहे. नकारार्थी लोकांपासून दूर राहा आणि स्वतःमधील आत्मविश्वासावर फुंकर घाला.
> – विश्वास नांगरे-पाटील, विशेष पोलिस महानिरीक्षक

> छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वि. दा. सावरकर, विवेकानंद यांच्यासारखे 'आयडॉल' आयुष्यात हवेत.
> – धनंजय महाडिक, खासदार

'कसं काय कोल्हापूर?' अशी जिव्हाळ्याने विचारणा करीत माधवन यांनी 'तरुणाईने काय केले पाहिजे' याविषयी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "मी इंजिनिअर व्हावे, अशी माझ्या वडिलांची इच्छा होती. एका महाविद्यालय परिसरात मी व वडील गेलो होतो. समोरून चार मुली स्कर्टमध्ये

पान ८ वर »

# कोल्हापूरची ऊर्जा इतरांनाही द्या..

» पान १ वरून

पाहताच वडिलांनी आपला निर्णय बदलला. त्यानंतर माझ्या शिक्षणासाठी आम्ही कोल्हापुरात आलो. रेल्वेस्थानकावर आल्यानंतर रिक्षात बसलो. रिक्षावाल्याने महालक्ष्मीचे गीत लावले. त्याचवेळी वडिलांनी शिक्षणासाठी हेच चांगले शहर असल्याचे ठरवून टाकले आणि माझा राजाराम महाविद्यालयातील प्रवेश निश्चित झाला."

"कोल्हापुरात असताना मला प्रत्येकाने मदत केली. कोल्हापूरकरांकडून मी खूप काही शिकलो" अशी आठवण सांगताना माधवन म्हणाले, "येथील लोक उदार आणि नम्र आहेत. मात्र, आता जग ज्या वेगाने बदलत आहे, तो बदल आत्मसात करायला पुढे या. तुमच्यात खूप शक्ती आहे. ही शक्ती विधायक मार्गाला लावून सामाजिक ऋणातून उतराई होण्यासाठी योगदान द्या."

### 'होय मी स्टडी रूममध्ये येत होतो...'

**मिलिंद धोंड यांनी ते व माधवन शिवाजी विद्यापीठात अभ्यासाला येत होते, असा उल्लेख केला. तो धागा पकडत, माधवन म्हणाले, "मी राजाराम महाविद्यालयात असताना विद्यापीठातील स्टडी रूममध्ये येत होतो, हे खरे आहे. मात्र, अभ्यासासाठी नव्हे, तर एका मुलीसाठी. तीच माझी पत्नी झाली. सुरवातीला ती महालक्ष्मी होती, आता ती दुर्गा झाली आहे." त्यांच्या या वक्तव्यावर लोककला केंद्रात शिट्यांचा आवाज घुमला.**

### तरुणाईची तुडुंब गर्दी

**माधवन येणार असल्याने लोककला केंद्रात तरुणाईने तुडुंब गर्दी केली. ते स्टेजवर येताच अनेकांनी मोबाईलद्वारे त्यांची छायाचित्रे टिपली. काहींनी त्यांच्याबरोबर स्टेजवरच सेल्फी घेतले.**

श्री. नांगरे-पाटील म्हणाले, "महाविद्यालयीन जीवनात माधवन तळपता तारा होते. ते माझा आयडॉल होते. वसतिगृहात असताना ते एक स्वप्नाळू तरुण होते. ते आम्हाला इंग्रजी शिकवायचा प्रयत्न करायचे. त्यांनी मला आयुष्याच्या 'ब्ल्यू प्रिंट'मध्ये उनाडपणा येतो का, असा प्रश्न विचारला होता. या प्रश्नाने मी गंभीर झालो. मित्रांनो, तुमच्या आयुष्यातील 'ब्ल्यू प्रिंट' कमवायची वेळ हीच आहे. नकारार्थी लोकांपासून दूर राहा आणि स्वत:मधील आत्मविश्वासावर फुंकर घाला."

श्री. महाडिक म्हणाले, "आयुष्यात कोण आयडॉल असावे, हे महत्त्वाचे आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वि. दा. सावरकर, विवेकानंद यांच्यासारखे आयडॉल हवेत. कोल्हापूर जिल्ह्यात सुमारे २२ टक्के मुली शिक्षणापासून वंचित आहेत. हुंड्यातून स्त्रीभ्रूण हत्या होत आहे, हे लक्षात घेऊन तुमच्या भविष्याची वाटचाल कशी हवी, हे निश्चित करा."

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचेही या वेळी भाषण झाले. या वेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेल्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कौस्तुभ मराठे, प्रवीण घाटगे, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे उपस्थित होते. कम्पॅशनचे प्रमुख मिलिंद धोंड यांनी स्वागत केले.

19 SEP 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनो, स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करा


## विद्यापीठातील कार्यक्रमात प्रसिध्द अभिनेता आर. माधवन यांनी दिला तरूणाईला संदेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थी मित्रांनों, नेहमी काहीतरी नव–नवीन गोष्टी शिकण्याची तयारी ठेवा. स्वतः ची बलस्थाने ओळखा. अपयशाची भिती न बाळगता मार्गक्रमण करा. आणि क्षेत्र मग ते कोणतेही असो, आपल्या जीवनात स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण करा. स्वतःमधील उर्जाशक्तीचा विधायक कार्यासाठी वापर करा, असा संदेश हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेता आर. माधवन यांनी दिला. शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमात कॉम्पॅशन २४ स्वयंसेवी संस्थेच्यावतीने कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील दोन हजार विद्यार्थीनींचे शैक्षणिक उत्तरदायित्व स्वीकारून त्यांना शैक्षणिक साहित्याचे समारंभपूर्वक वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान, रिमझिम पडणाऱ्या पावसातही विद्यापीठाच्या तुडूंब भरलेल्या लोकविकास केंद्राबाहेरही तरूणाईने आर. माधवन यांची झलक पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती. यानिमित्ताने विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आल्याचे चित्र दिसत होते.

शिवाजी विद्यापीठातील लोकविकास केंद्राच्या हॉलमध्ये सोमवारी सायंकाळी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला खासदार धनंजय महाडिक, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक विश्वास नांगरे–पाटील, उपकुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर,




बी.सी.यु.डी.चे माजी संचालक डॉ. डी. आर. मोरे, मिलिंद धोंड, कौस्तुभ मराठे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आर. माधवन यांनी कोल्हापुरातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, कोल्हापुरात राहत असताना वेगवेगळया गोष्टी शिकायला मिळाल्या. शिवाजी विद्यापीठाचा परिसर खुप छान आहे. राजाराम कॉलेजमध्ये शिकत असताना शिवाजी विद्यापीठाच्या स्टडी सेंटरमध्ये आम्ही अभ्यास करत असु. मी अभियांत्रिकी शाखेमध्ये करिअर करावे, असे माझ्या वडिलांना वाटत होते. मात्र, मी वेगळी वाट चोखाळली आणि कोल्हापुरात आलो. वडिलांना वाटले होते की मी पुण्यामध्ये शिक्षण घेईन. मात्र, कोल्हापुरची निवड केल्यामुळे वडिलांना आश्चर्य वाटले, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मिलिंद धोड यांनी स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून २ हजार मुलींचे शैक्षणिक उत्तरदायित्व स्वीकारून कौतुकास्पद कार्य हाती घेतले आहे. गेल्या सहा वर्षापासून हा उपक्रम सुरू आहे, असे सांगत खासदार धनंजय महाडिक म्हणाले, आजचे आपले आयडॉल हे छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, स्वामी विवेकानंद हे असायला हवेत. या सर्व महान विभुतींचे कार्य डोळ्यासमोर ठेवून तरूणाईने मार्गक्रमण करावे, असा सल्ला दिला.

विश्वास नांगरे–पाटील यांनी, राजाराम कॉलेजमधील आर. माधवन यांच्यासोबत घालवलेले क्षण व जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, १९९० साली स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी आर. माधवन याच्या रूपाने स्वप्नाळू डोळ्याचा तरूण, देखणा मित्र म्हणून लाभला. त्याच्यात जिद्द, चिकाटी व कष्ट करण्याची तयारी असल्याचे जाणवले. शांत, संयमी, मितभाषी व स्थितप्रज्ञ ही त्याची गुणवैशिष्ट्ये होती. एकेदिवशी कोणाबरोबर तरी माझी मारामारी झाली. तेव्हा आर. माधवन याने मला तुझ्या आयुष्यात मारामारी किंवा उनाडपणा येतो का, असा प्रश्न मला विचारला. तेव्हा तोच माझा गुरू ठरला. तो मला इंग्रजी शिकवायचा. त्याच्याकडून उत्साह व प्रेरणा मिळायची.

मिलिंद धोंड यांनी दोन हजार मुलींचे शैक्षणिक उत्तरदायित्व स्वीकारण्यामागील हेतु विषद केला. तसेच 'कॉम्पॅशन २४" या स्वयंसेवी संस्थेतर्फे राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आढावा घेतला. यादरम्यान, विविध शाळांतील लाभार्थी विद्यार्थीनींनी या उपक्रमाबद्दल आपले मनोगत मांडले. कार्यक्रमाप्रसंगी वुई केअरच्या स्वयंसेवकांनी महिला अत्याचाराला विरोध दर्शवणारे नाटक देखो...नाटक हे पथनाट्य सादर केले. या कार्यक्रमाचे मिडिया पार्टनर चॅनेल बी, हेल्पलाईन वुई केअर आदी होते.

### विनम्रता जोपासा....स्वतःची ओळख निर्माण करा

विद्यार्थी मित्रांनों, स्वतःची ओळख निर्माण करा. बुध्दिमत्तेबरोबरच स्वतः ला घालून दिलेली स्वयंशिस्त आणि विनम्रतेमुळे तुम्ही जग जिंकू शकता. तुम्ही इतरांच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण करू शकता. मी जेव्हा कोल्हापुरातून मुंबईला फिल्म इंडस्ट्रीमध्ये करिअर करण्यासाठी गेलो, मला याचा चांगलाच अनुभव आला. त्यामुळे तुम्ही किती टॅलेन्टेड आहात यापेक्षा तुम्ही किती नम्र व विनयशील आहात, हेदेखील महत्वाचे ठरत असते. करिअर करताना या गोष्टी नेहमीच लक्षात ठेवा, असाही सल्ला माधवन यांनी दिला.

### विधायक गोष्टींना कोल्हापूरकर डोक्यावर घेतात...

विधायक व समाजपयोगी गोष्टींना कोल्हापुरकर नेहमीच डोक्यावर घेतात. त्यामुळे इथल्या माणसांबरोबर आपुलकी आणि जिव्हाळयाचे नाते निर्माण होते. इथली माणसं एकमेकांच्या मदतीला धावून धावून जातात. इथल्या माणसांत सह्दयतेसोबत संवेदनशीलताही आहे. हे जिवंतपणाचे लक्षण आहे, असे गौरवोद्‌गार आर. माधवन यांनी काढले.



### ऑल इज वेल....

आर. माधवन यांचे व्यासपीठावर आगमन होताच, उपस्थित तरूणाईने त्यांच्या थ्री इडियट या चित्रपटातील 'ऑल इज वेल" चा वारंवार उच्चार सुरू केला होता. माधवन यांचे काही जुने मित्र या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांनी व्यासपीठावर जावून माधवन यांच्याशी हस्तांदोलन केले. काहींनी सही घेतली. तर काही युवक व युवतींनी त्यांच्यासोबत सेल्फीही काढून घेतले. यानिमित्ताने तरूणाईच्या उत्साहाला उधान आल्याचे चित्र निर्माण झाले होते. माधवन यांनी मराठीतूनही काही वेळ संवाद साधत उपस्थितांची मने जिंकली.

### कोल्हापुरातील रिक्षा जगात भारी....

आर. माधवन म्हणाले, कोल्हापुरातील रिक्षातून फिरण्याचा अनुभव काही औरच असतो. कोल्हापुरातील रिक्षा या जगात भारी आहेत. याचा अनुभव मी घेतला आहे. रिक्षांमध्ये लावलेल्या गाण्यांमुळे प्रवासाबरोबर मनोरंजनही होते.

### तरीही मुली शिक्षणापासून वंचित....

खासदार महाडिक म्हणाले, माणसाला हव्यास नसता तर स्त्रीभ्रुण हत्या झाली नसती. कोल्हापुर जिल्हा दरडोई उत्पन्नात देशात आघाडीवर आहे. तरीही जिल्ह्यातील मुली शिक्षणापासून वंचित आहेत. हे दुर्दैव आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी भगीरथी महिला संस्था, धनंजय महाडिक युवा शक्ती, वुई केअर यासारख्या संस्था प्रयत्न करत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 SEP 2017
Times of India

# Make efforts, conquer the world, actor tells students

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Kolhapur city is so full of energy that no other city in the country can match up to it, film actor R Madhavan said on Monday. He was addressing a jam-packed Lok Kala Kendra at Shivaji University, Kolhapur campus.

Madhavan was the key note speaker in an event organised by Compassion24, wherein the flagship project of education wise adoption of 2,000 genuinely needy girl students started. Adressing the students Madhavan said. "I was here during my college days. I had worked on my skills and eventually got the taste of success."

Vishwas Nangre Patil, inspector general of police, Kolhapur range, delivered the motivational speech during the program.

He said, "Madhavan was my classmate during college days. He was my idol back then. He was dedicated, stubborn and confident, which paved the way for his success. One needs to create their blueprint of life in the college days only. Working consistently towards your goal, takes you towards the success."

Speaking on the occasion, Member of Parliament, Dhananjay Mahadik, said that the initiative to offer 2000 girls the free education is very commendable, and Milind Dhond, president of Compassion24 should be congratulated for it."

During his speech, vice chancellor . SUK, Devanand Shinde, said that every stratum of the society needs to contribute in social work. The initiative for the girls' education is worth appreciating and needs to be replicated by others as well.

19 SEP 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

व्ही. डी. नांदवडेकर : चंदगडमध्ये ३७ व्या युवा महोत्सवाचे उद्‌घाटन

# कला जगण्याचा आधार बनेल

लोकमत न्यूज नेटवर्क

चंदगड : चंदगड तालुक्यात शिवाजी विद्यापीठाचा कला महोत्सव हा प्रथमच होत असून यातून चांगले कलाकार घडतील. युवा महोत्सवात सहभागी झाल्याशिवाय धाडस येत नाही. विद्यापीठाच्या कला महोत्सवातून आजपर्यंत अनेक कलाकार घडले आहेत. या महोत्सवात आत्मसात केलेली कला भविष्यात जगण्याचा आधार बनेल. युवा महोत्सवातून भावी कलाकार उदयास यावेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर यांनी केले.




चंदगड येथे ३७ व्या युवा महोत्सवाचे दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर यांनी केले. यावेळी व्ही. आर. बांदिवडेकर, पी. सी. पाटील, धनंजय पाटील, विकास पाटील, आदी उपस्थित होते.

चंदगड येथे शिवाजी विद्यापीठ व र. भा. माडखोलकर महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ३७ व्या कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य व्ही. आर. बांदिवडेकर होत्या. महोत्सवात ४७ महाविद्यालयाचे १२०० विद्यार्थी १४ कलाप्रकारात सहभागी झाले आहेत.

प्राचार्य डॉ. पी. आर. पाटील यांनी प्रास्ताविक केला. यावेळी विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी असे महोत्सव आयोजित केल्याचे सांगितले.

नाट्यकलाकार धनंजय पाटील यांनी कलाकार हा कलेचा भुकेला असतो. कलाकार हा संवेदनशील असतो. कलाकाराने भूमिका जगावी व त्या भूमिकेत शिरकाव केल्यास कला जिवंत होते,असे सांगितले.

अभिनेते विकास पाटील म्हणाले, स्पर्धेमध्ये यश-अपयश याचा विचार करायचा नसतो, विद्यार्थ्यांची आंतरिक इच्छा ओळखून त्याला प्रोत्साहन द्यावे. यशासाठी सतत प्रयत्न करत रहावे. युवक महोत्सवातून कला निर्माण करण्याची ऊर्जा मिळते.

दिग्दर्शक अवधूत जोशी यांनी कोणत्याही क्षेत्रात आपली जागा अशी निर्माण करा की यश आपल्याकडे आपोआप खेचले पाहिजे. यावेळी माजी मंत्री भरमूअण्णा पाटील यांनी या युवा महोत्सवाला सदिच्छा भेट देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रा. आर. पी. पाटील, प्रा. पी. सी. पाटील, य. भा. बोकडे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

19 SEP 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा महोत्सवातूनच कलाकारांची निर्मिती

## कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर : चंदगड येथील युवा महोत्सवाचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
चंदगड

शिवाजी विद्यापीठाने युवा महोत्सवाच्या माध्यमातून अनेक कलाकार निर्माण केले आहेत. युवा महोत्सवात यश-अपयश मिळो; अशा कार्यक्रमातील सहभागाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. कोणतीही कला जीवनाचे सार्थक करण्यात योगदान देत असते. कला माणसाला घडवते, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ आणि चंदगड येथील र. भा. माडखोलकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ३७ व्या कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या उद्‌घाटन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्या सौ. व्ही. आर. बांदिवडेकर होत्या.



**चंदगड : येथे युवा महोत्सवात तुतारी फुंकताना विद्यार्थी.**

यावेळी नांदवडेकर म्हणाले, कोणतीही कला माणसाला जगण्याचे बळ देते. सामाजिक कार्यकर्त्या सिंधुताई सपकाळ यांनी रेल्वे स्थानकात बहिणाबाई चौधरींची गीते गाऊन आपले पोट भरतानाच, लोकलमधील भिकाऱ्यांनाही हक्काची भाकरी मिळवून दिली. कला जगण्यासाठीचे सामर्थ्य देते. नागनाथ मंजुळे सारख्या दिग्दर्शकाने 'सैराट' सारखी कलाकृती बनवून अवघ्या मराठी प्रेक्षकांना नाचवले. तेही युवामहोत्सवातून घडले आहेत. युवा महोत्सव ही कलाकार निर्मितीची खाण आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

संबंधित वृत्त व छायाचित्रे
पान ५ वर

19 SEP 2017
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुस्तकांसोबत स्कीलचीही गरज : नांदवडेकर

## चंदगड येथे ३७ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**चंदगड : प्रतिनिधी**

आज शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड स्पर्धा वाढली आहे. नोकऱ्या मिळणे कठीण झाले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या अंगातील कलागुणांनुसार क्षेत्र निवडण्याची गरज आहे. कलेच्या माध्यमातून कोणीही उपाशी राहू शकत नाही. पुस्तकांसोबतच स्कीलची गरज आहे. कलेला प्रोत्साहन मिळावे, या हेतूने शिवाजी विद्यापीठाने भावी कलाकार घडावा, यासाठी युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे. या युवा महोत्सवातून विद्यापीठाच्या अनेक कलाकारांनी चित्रपट, मालिका, नाटकांतून यश मिळवले आहे. ही विद्यापीठाची भूषणावह बाब असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर यांनी केले. ते येथील खेडूत शिक्षण मंडळाच्या र. भा. माडखोलकर महाविद्यालयात आयोजित केलेल्या ३७ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या उद्घाटन समारंभप्रसंगी उद्घाटक या नात्याने बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रशासन अधिकारी सौ. व्ही. आर. बांदिवडेकर पान ८ वर



**चंदगड : येथील माडखोलकर महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर. शेजारी पी. आर. पाटील, प्रा. पी. सी. पाटील, अवधूत जोशी, सौ. व्ही. आर. बांदिवडेकर, धनंजय पाटील आदी.**

## पुस्तकांसोबत स्कीलचीही गरज : नांदवडेकर

**(पान १ वरून)** होत्या. स्वागत शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. बी. गुरव यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. पी. आर. पाटील यांनी करून युवा महोत्सवाची माहिती दिली. महोत्सवाचे उद्घाटन व्ही. डी. नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. कलाकाराला भौतिक ज्ञान असणे आवश्यक आहे.

कलाकार संवेदनशील असल्याशिवाय कलाकार होत नसल्याचे चित्रपट व नाट्य दूरदर्शन मालिका कलाकार धनंजय पाटील यांनी सांगितले. यश अपयश महत्त्वाचे नसते. तर सहभाग महत्त्वाचा असतो. अपयशातूनच जिद्दी कलाकार तयार होतो, असे मत चित्रपट कलाकार विकास पांडुरंग पाटील यांनी मांडले.

आपली जागा अशी निर्माण करा की, तुम्ही त्यात यशस्वी व्हाल. यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम घेऊन ते खेचून आणण्यासाठी ताकद निर्माण करा. जेवढे तुम्ही हरत जाल तेवढे शिकत रहाल असा मोलाचा सल्ला चित्रपट कलाकार अवधुत जोशी यांनी दिला.

कला क्षेत्र तुमच्यासाठी वाट पाहत आहे. अपार परिश्रम घ्या आणि उच्च शिखरावर पोहोचा, असे आवाहन आजरा महाविद्यालयाचे प्राचार्य एम. एल. होनगेकर यांनी केले. सौ. व्ही. आर. बांदिवडेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी माजी राज्यमंत्री भरमूअण्णा पाटील, प्रा. आर. पाटील, प्रा. पी. सी. पाटील, य. भा. बोकडे, ॲड. आर. पी. बांदिवडेकर, एम. एम. तुपारे, ज. गा. पाटील, अशोक पाटील, गोपाळ बोकडे, एल. डी. कांबळे, डॉ. एस. पी. बांदिवडेकर, मुरली बल्लाळ, एस. आर. देशमुख, एस. के. सावंत बी. एम. पाटील, मारुती गावडे संजय पाटील यांच्यासह प्राध्याप शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते सूत्रसंचालन प्रा. सौ. एस. बी दिवेकर यांनी केले. आभार डॉ. पी एल. भादवणकर यांनी मानले.

19 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'युवा'तून अभिव्यक्तीची संधी

## कुलसचिव नांदवडेकर : माडखोलकर महाविद्यालयात युवा महोत्सव

सकाळ वृत्तसेवा



चंदगड : र. भा. माडखोलकर महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ अंतर्गत युवा महोत्सवाचे उद्घाटन करताना कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर. शेजारी प्रा. पी. सी. पाटील, सौ. व्ही. आर. बांदिवडेकर, अभिनेता धनंजय पाटील आदी.

चंदगड, ता. १८ : युवा महोत्सवातून विद्यार्थ्यांना अभिव्यक्तीची संधी मिळते. रसिक प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या प्रतिसादातून त्यांची कलाकारी बहरते. यामुळे असे महोत्सव गरजेचे आहेत, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. डी. नांदवडेकर यांनी व्यक्त केले.

विद्यापीठ अंतर्गत ३७ वा युवा महोत्सव आज येथील र. भा. माडखोलकर महाविद्यालयात झाला. याचे उद्घाटन श्री. नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते. खेडूत शिक्षण संस्थेच्या संचालिका व प्रशासन अधिकारी सौ. व्ही. आर. बांदिवडेकर अध्यक्षस्थानी होत्या. अभिनेते धनंजय पाटील व विकास पाटील प्रमुख पाहुणे होते.

श्री. नांदवडेकर म्हणाले, ''कोल्हापूर हे कलेचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. या शहराने चित्रपटसृष्टीला अनेक कलाकार दिले. आजही विद्यापीठ परिसरात व जिल्ह्यात विविध ठिकाणी चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिकांसाठी चित्रीकरण सुरू आहे. यासाठी स्थानिक कलाकारांचा सहभाग महत्त्वाचा आहे. युवा महोत्सवासारख्या उपक्रमांमुळे कलाकार घडले आहेत. याचेच हे उदाहरण मानावे लागेल.''

सौ. बांदिवडेकर म्हणाल्या, ''विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणारे युवा महोत्सव ही कलाकारांसाठी मोठी संधी आहे. त्याचा लाभ घ्यायला हवा.'' अभिनेते धनंजय पाटील व त्यांचे भाऊ विकास यांनी कला क्षेत्रातील करिअरविषयी मार्गदर्शन केले. महोत्सव संयोजन समितीचे अध्यक्ष आणि प्राचार्य डॉ. पी. आर. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. माजी राज्यमंत्री भरमू पाटील, संस्थेचे सचिव प्रा. आर. पी. पाटील, सहसचिव एल. डी. कांबळे, संचालक प्रा. पी. सी. पाटील, प्राचार्य व्ही. जी. तुपारे, डॉ. पी. एल. भादवणकर, डॉ. आर. व्ही. गुरव, प्रा. एस. के. सावंत, प्रा. ए. डी. कांबळे, प्रा. बी. एम. पाटील, प्रा. एल. एन. गायकवाड, प्रा. एस. बी. दिवेकर, आर. आर. देशपांडे यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक उपस्थित होते.

